**<u>नि.क्र. १६ वरील आदेश</u>**

(दि.२३.०२.२०२६)

आरोपी क्र.१ व २ मार्फत सदर अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २२७ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २५०) अन्वये दोषारोपामधुन मुक्त करण्यासाठी दाखल केला आहे.

२. आरोपींच्या कथनाप्रमाणे तक्रारदार श्री.किशोर गुलाबराव राजपुत यांच्या फिर्यादीवरुन दिनांक १५/११/२०२३ रोजी भांदवि कलम ३५३, ३७९, ५०४, ५०६, ३४ अंतर्गत त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे जाफ्राबाद येथे गुन्हा नोंदविला आहे. त्यांच्यावर शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा, चोरी केल्याचा व धमकी दिल्याचा आरोप आहे. तथापि आरोपींविरुध्द कोणताही ठोस पुरावा नाही. तक्रारदार व अर्जदार यांच्यामध्ये पुर्वीपासुन वैयक्तीक तसेच कार्यालयीन मतभेद आहेत. त्या पाश्वभुमीवर सुड बुध्दीने तक्रार दाखल करण्यात आली आहे. दोषारोप पत्रामधील कागदपत्रावरुन अर्जदारांचा गुन्हयाशी प्रत्यक्ष सहभाग सिध्द होत नाही. कथीत घटनेच्या दिवशी अर्जदार त्याठिकाणी उपस्थीत नव्हते ही बाब तपास अधिकारी यांनी दुर्लक्षीत केली आहे. आरोपींकडुन कोणतीही चोरीची मालमत्ता जप्त करण्यात आलेली नाही. आरोपींचे नाव केवळ संशयावरुन समाविष्ट केले असुन त्यास कोणताही वस्तुनिष्ठ पुष्टी नाही. तक्रारदाराच्या जबाबात आरोपींकडुन कोणत्याही प्रकारचा बळाचा वापर केल्याबाबत आलेले नाही. शासकीय कामात अडथळा आणला याचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यांच्याविरुध्द बनावट व खोटे आरोप केलेले आहेत. त्यांनी शासकीय कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा केलेला नाही. पोलीस तपासात आरोपींकडे कोणतीही चोरीची वस्तु, मालमत्ता किंवा चोरीचे उद्येिष्ट आढळुन आलेले नाही. साक्षीदारांच्या जबाबात केवळ

वाद झाला एवढाच उल्लेख आहे जो भा.दं.वि. कलम ५०४ व ५०६ च्या परिघात येत नाही. भा.दं.वि. कलम ३४ लागु होण्यासाठी किमान दोन व्यक्तीचे एकत्र हेतुचे ठोस पुरावे आवश्यक आहेत. परंतु दोषारोपत्रात कोणत्याही सामुहीक हेतु नमुद नाही. आरोपींविरुध्द सकृतदर्शनी दोषारोप निश्चित करण्याइतपत कोणताही पुरावा नाही. त्यांच्याविरुध्द प्राथमिक गुन्हा सिध्द होत नाही, म्हणुन विनंती की आरोपींना सदर खटल्यातुन दोषमुक्त करण्यात यावे.

३. सरकार पक्षाच्या वतिने सरकारी वकील श्री.दिपक कोल्हे यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास प्रखर विरोध केला आहे. आरोपींनी फिर्यादीची गच्ची धरुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली व फिर्यादीस धक्काबुक्की करुन अवैध वाळुने भरलेले ट्रॅक्टर जबरदस्तीने पळवुन नेले आहे. त्यानंतर ट्रॅक्टर एका शेतात लावलेले दिसले. म्हणुन आरोपींनी सरकारी कामात अडथळा करुन गौण खणीज कायदयाप्रमाणे गुन्हा केला आहे. दोषारोप निश्चीत करण्याइतपत पुरेसा पुरावा दोषारोपत्रामध्ये आलेला आहे. गुन्हयाचे स्वरुप गंभीर आहे. तरी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. आरोपींचे तसेच सरकारी पक्षाचे विद्वान विधिंज्ञाचा युक्तीवाद ऐकला. दोषारोपपत्र, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, साक्षीदारांचे तपास टिपण व फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र ई.चे अवलोकन करण्यात आले. सदर तक्रार फिर्यादी किशोर गुलाबराव राजपुत, तलाठी तहसिल कार्यालय जाफ्राबाद यांनी दिनांक १५/११/२०२३ रोजी दिलेली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन गुन्हा रजि.नं. ३०२/२००३, भादंवि कलम ३५३, ३७९, ५०४, ५०६, ३४ व गौण खणिज कायदयाचे कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे. सरकार पक्षाच्या कथनाप्रमाणे दिनांक १५/११/२०२३ रोजी रात्री १.४५ वाजताचे सुमारास तहसिलदार सारीका भगत मॅडम, सोबत फिर्यादी किशोर राजपुत, अमोल जाधव व चालक दिनकर निकाळजे असे जाफ्राबाद ते निमखेडा रस्त्याने गस्त घालीत

असतांना एक सोनालीका ट्रॅक्टर विनाक्रमांकाचे अवैध वाळुने भरलेले दिसले. तेव्हा तेथे गौतम कासारे व आणखी एक इसम असे तेथे आले व त्यांनी सदर ट्रॅक्टर चालवायला घेतले. त्यांनतर गौतम कासारे व त्याच्यासोबत असलेल्या अनोळखी ईसम (शंकर भोपळे) यांना सदरचे ट्रॅक्टर पोलीस ठाणे जाफ्राबाद येथे घेण्यास सांगीतले. अनोळखी ईसमाने ट्रॅक्टर चालु केले, तेव्हा गौतम कासारे त्यास म्हणाला की, तु ट्रॅक्टर काढुन घे, मी यांना पाहतो. तेव्हा गौतम कासारे याने फिर्यादीची गच्ची धरुन त्यास शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीला धक्काबुक्की केली व ट्रॅक्टर बाजुला केले व जबरदस्तीने सदरचे ट्रॅक्टर पळवुन नेले. आरोपींनी अवैधरित्या १ ब्रास रेती ३०००/– रुपये किमतीची गौण खणिज चोरी करुन दोन्ही आरोपींनी शासकीय कामात अडथळा निर्माण करुन कायदेशीर कार्यवाही करत असतांना सदरचे ट्रॅक्टर जबरदस्तीने पळवुन नेले. तरी त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची विंनती केली.

५. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. एस.डी. तायडे यांनी केला. दिनांक १६/११/२०२३ रोजी तपासी अंमलदार यांनी दोन सरकारी पंच साक्षीदारांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला व नकाशा काढला. सदर पंचनाम्यावर घटनास्थळ हे जाफ्राबाद ते निमखेडा रोडवर शेत गट क्र.१५, शिवार जाफ्राबाद येथे दिसुन येते. तपासी अंमलदार यांनी फिर्यादीचे तपास टिपण व पुरवणी जबाब नोंदवले. तसेच साक्षीदार दिनकर दौलत निकाळजे, सारीका भिमराव भगत– तहसिलदार, सुभाष नारायण जायभाये– पो.हे.कॉ व राम विष्णु मोरे– चालक यांचे तपासटिपण नोंदविले आहे. सदर सर्व साक्षीदारांच्या जबाबावरुन फिर्यादीमध्ये कथन केल्याप्रमाणे मजकुर आलेला आहे. सदर जबाबावरुन असे दिसुन येते की, आरोपींनी फिर्यादीची गच्ची धरुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपींनी फिर्यादीस धक्काबुक्की करुन अवैध रेतीने भरलेला ट्रॅक्टर जबरदस्तीने पळवुन नेला व एका शेतात लावला. अशाप्रकारे आरोपींनी त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. फिर्यादी किशोर

गुलाबराव राजपुत यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यात आले आहे व त्यामध्ये त्यांना साध्या स्वरुपाची ईजा दर्शविली आहे. त्यामुळे उपरोक्त सर्व साक्षीदारांच्या पुराव्यावरुन सकृतदर्शनी आरोपींविरुध्द कथित गुन्हयाशी संबंधीत पुरेसा पुरावा आढळुन येत आहे. त्यांच्या पुराव्यावरुन हे स्पष्ट दिसुन येते की, आरोपींनी फिर्यादीची गच्ची धरुन त्यास धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली तसेच अवैध रेतीने भरलेला ट्रॅक्टर जबरदस्तीने व विनापरवाना वाळु चोरीच्या उद्येशाने पळवुन नेउन इतर शेतात जाउन लपविला. त्यावरुन आरोपींचे सदर प्रकरणात सरकार पक्षाने कथन केल्याप्रमाणे गुन्हयाशी संबंधीत प्रथमदर्शनी स्पष्ट कृत्य दिसुन येत आहे.

६. आरोपींच्या कथनाप्रमाणे तपासामध्ये त्यांचेविरुध्द कोणताही ठोस पुरावा आलेला नाही व त्यांचा गुन्हयात सहभाग नाही अथवा ते घटनेच्या दिवशी तेथे उपस्थीत नव्हते. परंतु सदयस्थीतीत आरोपीविरुध्द गुन्हयाशी संबंधीत पुरेसा पुरावा उपलब्ध आहे. संपपरीक्षेच्या दरम्यान आरोपींना त्यांचा बचाव मांडण्याची संधी आहे. साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपींविरुध्द सकृतदर्शनी दोषारोप निश्चीत करण्याइतपत पुरेसा पुरावा दिसुन येत आहे.

७. आरोपींच्या वतीने सदर प्रकरणात **State Vs. Karnataka Vs. L. Muniswamy (AIR 1977 SC 1489)** तसेच **Union of India Vs. Prafulla Kumar Samal (1979)3 SCC 4** या दोन न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्यात आली. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने साक्षीदारांचे जबाब, कागदपत्रे आणि संपुर्ण केसचा एकत्र विचार करुन असे निर्णीत केले आहे की, *जर कोणताही प्रारंभीक दोष दिसत नसेल तर कलम २२७ अन्वये अर्जदार/आरोपी यांना डिस्चार्ज करण्यात यावे.*

तसेच आरोपींच्या वतीने **R.P. Kumar Vs. State of Punjab (AIR 1960 SC 866)** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्यात आली असुन सदर

न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्णीत् केले आहे की, *“ज्या ठिकाणी आरोपांमधून कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही, त्या ठिकाणी आरोपीची प्रारंभिक टप्प्यावरच मुक्तता करणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे.”*

८. उपरोक्त न्यायनिर्णयांचे संपुर्ण संन्मानासह अवलोकन केले. परंतू सदर न्यायनिर्णय आणि प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती भिन्न असल्याने सदरचे न्यायनिर्णय या प्रकरणाच्या परीस्थितीशी लागु होत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपींविरुध्द कथीत गुन्हयाशी संबंधीत दोषारोप निश्चीत करण्याइतपत पुरेसा कोणताही प्राथमिक पुरावा नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोप निश्चीत करण्याइतपत पुरेसा पुरावा उपलब्ध असल्याने सदरचा अर्ज नामंजुर करणे न्याय व योग्य होईल. करीता आदेश.

**आदेश**

१. अर्जदार/आरोपींचा नि.क्र.१६ वरील दोषारोप मुक्त करण्याचा अर्ज याद्वारे नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by GURLING RAMLING DHEPE
Date: 2026.02.27 10:51:39 +0530

दिनांकः २३/०२/२०२६

( **जी. आर. ढेपे**)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना.